साक्षीदार क्र ०३ ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–आसीफ अहमद शेख
वय:–२६ वर्ष, व्यवसाय–दुकान
राह.बेला, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. पोलिसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी समन्सपत्र दिले नव्हते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही नाही, त्यातील मजकुर मला माहीती नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही नाही.

**<u>सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१०/०२/२०२२ रोजी पोलिसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी समन्सपत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर दिवशी घटनास्थळावर गेलो व माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला मला वाचुन दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष एक बासाची काडी जप्त केली होती. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड. एस.एस. रामटेके यांनी उलटतपास नाकारला.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दिण् ३०.१०.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड